# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक 16/3/2020

## सभा सुचना क्रं.13 दु.12.30 वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. 20/02/2020 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव** :- मागील मा.सर्वसाधारण सभा दि. 20/02/2020 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- (अतुल साळुंखे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | प्रश्नोत्तरे | |
| 3. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | |
| 4. | **सन 2020-21 हया वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 चे कलम 3 नुसार वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्यांच्या नियुक्तया करणेबाबत.** | **ठराव** :- वृक्षप्राधिकरण समितीवर नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेकामी बहुजन विकास आघाडीचे गटनेते यांनी केलेल्या खालील सदस्यांच्या नावाची शिफारस प्राप्त झाली आहे. 1) श्री मार्शल डॉमणिक लोपीस 2)श्री प्रफुल गोविंद पाटील 3)श्री मनिष आत्माराम वर्तक 4) श्री. दिलीप यशवंत गोवारी 5)श्रीमती प्रतिभा किशोर पाटील 6) श्रीमती शोभा नितीन मोरे 7)श्री मिलिंद घरत 8)श्री सचिन हरेश्वर घरत 9) श्री प्रकाश चौधरी 10) श्री रणजीत वामन पाटील 11) श्री पंकज चोरघे 12)श्री चंद्रकांत सिताराम जाधव 13)श्रीमती कल्पना रोहीदास म्हात्रे तसेच शिवसेनेचे गटनेते यांनी श्री स्वप्नील अविनाश बांदेकर यांच्या नावाची शिफारस केली आहे. सबब वृक्षप्राधिकरण समितीवर सन 2020-21 या वित्तीय वर्षासाठी सदस्य म्हणुन नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यास आजची मा. सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करीत आहे. |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th></tr>
<tr><td>1.</td><td>श्री मार्शल डॉमणिक लोपीस</td><td>8</td><td>श्री सचिन हरेश्वर घरत</td></tr>
<tr><td>2.</td><td>श्री प्रफुल गोविंद पाटील</td><td>9</td><td>श्री प्रकाश चौधरी</td></tr>
<tr><td>3</td><td>श्री मनिष आत्माराम वर्तक</td><td>10</td><td>श्री रणजीत वामन पाटील</td></tr>
<tr><td>4</td><td>श्री. दिलीप यशवंत गोवारी</td><td>11</td><td>श्री पंकज चोरघे</td></tr>
<tr><td>5</td><td>श्रीमती प्रतिभा किशोर पाटील</td><td>12</td><td>श्री चंद्रकांत सिताराम जाधव</td></tr>
<tr><td>6</td><td>श्रीमती शोभा नितीन मोरे</td><td>13</td><td>श्रीमती कल्पना रोहीदास म्हात्रे</td></tr>
<tr><td>7</td><td>श्री मिलिंद घरत</td><td>14</td><td>श्री स्वप्नील अविनाश बांदेकर</td></tr>
</table>
अनुमोदक :- (अब्दुल हक सुलेमान पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजूर
</td>
</tr>
<tr>
<td>5.</td>
<td><u>सन 2020-21 हया वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 30 व कलम 31- अ अन्वये महिला व बाल कल्याण समितीवर सदस्यांच्या नेमणूका करणे.</u></td>
<td>ठराव :- महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशाद्वारे नेमणुक करणेकामी बहुजन विकास आघाडीचे गटनेते यांनी केलेल्या खालील सदस्यांच्या नावाची शिफारस प्राप्त झाली आहे. 1) श्रीमती भारती प्रदीप देशमुख 2) श्रीमती ज्योती मच्छिंद्र धोंडेकर 3) श्रीमती ममता दुर्गेश सुमन 4)श्रीमती मनिषा मनोहर जाधव 5)श्रीमती कांता अनंत पाटील 6) श्रीमती माया सुबोध चौधरी 7) श्रीमती हेमांगी विनोद पाटील 8) श्रीमती निलीमा नरेश गायकवाड 9) श्रीमती जयश्री जयंवत किणी 10) श्रीमती आशा बाळकृष्ण धुलसाडा 11) श्रीमती प्रज्ञा विनेश देसाई 12) श्रीमती सुषमा उमेश दिवेकर 13) श्रीमती अजीव यशवंत पाटील 14) श्रीमती</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | नितिन दिनानाथ राऊत तसेच शिवसेनेचे गटनेते यांनी श्रीमती किरण उदय चेंदवणकर यांच्या नावाची शिफारस प्राप्त झाली आहे. सबब महिला व बाल कल्याण समितीवर सन 2020-21 या वित्तीय वर्षासाठी सदस्य म्हणुन नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यास आजची मा. सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करीत आहे. |

| अ.क्र. | सदस्याचे नाव | अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती भारती प्रदीप देशमुख | 9 | श्रीमती जयश्री जयंवत किणी |
| 2. | श्रीमती ज्योती मच्छिंद्र धोंडेकर | 10 | श्रीमती आशा बाळकृष्ण धुलसाडा |
| 3 | श्रीमती ममता दुर्गेश सुमन | 11 | श्रीमती प्रज्ञा विनेश देसाई |
| 4 | श्रीमती मनिषा मनोहर जाधव | 12 | श्रीमती सुषमा उमेश दिवेकर |
| 5 | श्रीमती कांता अनंत पाटील | 13 | श्रीमती अजीव यशवंत पाटील |
| 6 | श्रीमती माया सुबोध चौधरी | 14 | श्रीमती नितिन दिनानाथ राऊत |
| 7 | श्रीमती हेमांगी विनोद पाटील | 15 | श्रीमती किरण उदय चेंदवणकर |
| 8 | श्रीमती निलीमा नरेश गायकवाड | | |

**अनुमोदक :- (अब्दुल हक सुलेमान पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

<table>
<tr>
<td>6.</td>
<td>सन 2020-21 हया वित्तीय वर्षाच्या उर्वरीत कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 30 अन्वये स्थापित केलेल्या वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर कलम 31 अ (2) नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे सदस्यांच्या नेमणुका करणे.</td>
<td>ठराव :- वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर नामनिर्देशाद्वारे नेमणुक करणेकामी बहुजन विकास आघाडीचे गटनेते यांनी केलेल्या खालील सदस्यांची नावाची शिफारस प्राप्त झाली आहे. 1) श्री डॉ.प्रविण हिराजी क्षिरसागर<br>2) श्री संतोष दत्ताराम वडवईकर 3) श्री राजेंद्र राजाराम कांबळी 4) श्री पंकज भास्कर ठाकूर 5) श्री रमेश जयराम घोरकना 6) श्री भुपेंद्र आत्माराम पाटील 7) श्री सचिव संभाजी देसाई 8) श्रीमती निलीमा आनंद कांबळे 9) श्री महेश हरी पाटील .<br>सबब वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर सन 2020-21 या वित्तीय वर्षासाठी सदस्य म्हणुन नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यास आजची मा. सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करीत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th></tr>
<tr><td>1.</td><td>श्री डॉ. प्रविण हिराजी क्षिरसागर</td><td>6</td><td>श्री भुपेंद्र आत्माराम पाटील</td></tr>
<tr><td>2.</td><td>श्री संतोष दत्ताराम वडवईकर</td><td>7</td><td>श्री सचिव संभाजी देसाई</td></tr>
<tr><td>3</td><td>श्री राजेंद्र राजाराम कांबळी</td><td>8</td><td>श्रीमती निलीमा आनंद कांबळे</td></tr>
<tr><td>4</td><td>श्री पंकज भास्कर ठाकूर</td><td>9</td><td>श्री महेश हरी पाटील</td></tr>
<tr><td>5</td><td>श्री रमेश जयराम घोरकना</td><td></td><td></td></tr>
</table>
अनुमोदक :- (अब्दुल हक सुलेमान पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>7.</td>
<td>प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.04 मध्ये नारिंगी भवानी मंदिर ते चिखलडोंगरी डंपींग ग्राऊंडपर्यंत आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.</td>
<td>प्रस्तावाचा निर्णय :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु. 4,40,88,948/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई- निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| 8. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिकेची 9 प्रभाग समिती कार्यालये, मुख्यालय व वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग इ. कार्यालयांना प्रशासनाच्या कामकाजासाठी तसेच प्रसिध्दीसाठी विविध प्रकारची स्टेशनरी छपाई करणेकामी तसेच साहित्य व हिशोबाच्या नोंदीसाठी विविध प्रकारचे नमुने रजिस्टर वेळोवेळी छपाई करणेसाठी वार्षिक दरकरार करण्यास व त्याकरीता सन 2020/21 वर्षाकरीता रु. 1.55 कोटी खर्चास व सन 2021/22 या वर्षाकरीता 10% वाढीव खर्च विचारात घेता रक्कम रु. 1.72 कोटी प्रमाणे सन 2020/21 व 2021/22 या 2 (दोन) वर्षाकरीता एकूण रक्कम रु. 3 कोटी 27 लक्ष पर्यंतच्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2020 मध्ये होणार असल्याने नविन ई निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सन 2017-18 ते 2019-20 या त्रैवार्षिक निविदेच्या मुदतवाढीस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षाकरीता कार्यालयीन कामकाजासाठी टेबल, खुर्च्या, लोखंडी रॅक, कपाट इ. फर्निचर खरेदी करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय व 9 प्रभाग समिती कार्यालये, वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला बालकल्याण विभाग, अग्निशमन विभाग इ. कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाकरीता टेबल, खुर्च्या, लोखंडी रॅक, कपाट इ. फर्निचरची खरेदी करणेकामी वार्षिक दरकरार करण्यास व त्याकरीता सन 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षासाठी प्रति वर्ष रु. 70 लक्ष प्रमाणे 2 (दोन) वर्षाकरीता पॅनेलव्दारे ई निविदा मागवून आवश्यक फर्निचर खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रु.1 कोटी 40 लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2020 मध्ये होणार असल्याने नविन ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत सन 2018-19 ते 2019-20 या निविदेच्या मुदतवाढीस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 10. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन 2020-21 वित्तीय वर्षासाठी लेखन सामग्री व किरकोळ स्टेशनरी इ. खरेदी करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची 9 प्रभाग समिती कार्यालये, मुख्यालय व वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग इ. कार्यालयांना प्रशासनाच्या दैनंदिन कामकाजासाठी विविध प्रकारची लेखन सामग्री व किरकोळ स्टेशनरी साहित्याची खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार करण्यास व सन 2020-21 व वित्तीय वर्षाकरीता एकूण रक्कम रु. 1 कोटी इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2020 मध्ये होणार असल्याने नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सन 2019-20 या निविदेच्या मुदतवाढीस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | वसई विरार शहर महनगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या वित्तीय वर्षासाठी मुख्यालय व प्रभाग समिती ए,बी,सी,डी, ई, एफ,जी, एच व आय करीता स्टेज, मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी येणाऱ्या खर्चास मंजुरीबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजासाठी महापालिकेमार्फत विविध सामाजिक, सांस्कृतीक, सार्वजनिक कार्यक्रम, महापौर मॅरेथॉन, गणेश विसर्जन व्यवस्था, शालेय कला-क्रिडा महोत्सव, जिल्हास्तरीय कला-क्रिडा स्पर्धा, महानगरपालिका आयोजित विविध समाजिक/ सांस्कृतीक व लोकार्पण कार्यक्रमासाठी स्टेज, मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी इ. व्यवस्था भाड्याने पुरवठा करणेकामी वार्षिक दरकरार करण्यास व सन 2020/21 वर्षाकरीता रु. 3 कोटी 38 लक्ष प्रती वर्ष प्रमाणे सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या 3 वर्षाकरीता ई-निविदा मागवून पॅनेलवर ठेकेदार नियुक्ती करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. 10 कोटी पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2020 मध्ये होणार असल्याने नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सन 2017/18 ते 2019/20 या त्रैवार्षिक निविदेच्या मुदतवाढीस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 12. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षाकरीता चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इत्यादी व्यवस्था करणेकामी येणाऱ्या खर्चास मंजूरीबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिकेचे विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडा महोत्सव तसेच विविध बैठकांचे आयोजन वर्षभर होत असते. त्याकरीता आवश्यक व्यवस्था करणेकामी वार्षिक दरकरार करणेस व सन 2020-21 वित्तीय वर्षासाठी रु. 1 कोटी व सन 2021-22 या वित्तीय वर्षाकरीता रु. 1.10 कोटी प्रमाणे 2 (दोन) वर्षाकरीता ई-निविदा मागवून पॅनलवर ठेकेदार नियुक्त करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. 2 कोटी 10 लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2020 मध्ये होत असल्याने नविन ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सन 2017-18 ते 2019-20 या त्रैवार्षिक निविदेच्या मुदतवाढीस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्या दैनदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या त्रैवार्षिक करीता आवश्यकतेप्रमाणे औषधे, उपकरणे, रुग्णालयीन साहित्य, साथ प्रतिबंधक लस, प्रयोगशाळा रसायने, यंत्रे व कापड प्रकार खरेदी तसेच ऑक्सिजन सिलिंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या ई-निविदा मागविणेकामी आवश्यक प्रकिया करुन संविदा करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव/ निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या त्रैवार्षिक करीता आवश्यकते प्रमाणे औषधे, उपकरणे, रूग्णालयीन साहित्य, साथ प्रतिबंधक लस, प्रयोगशाळा रसायने, यंत्रे व कापड प्रकार खरेदी तसेच ऑक्सिजन सिलिंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या ई निविदा मागविणेकामी आवश्यक प्रक्रिया करुन संविदा करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळण्याबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, सदर कामी वार्षिक दराच्या ई निविदा प्रक्रिया करणेस तसेच सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.1 ते 4 वरील नमुद ई-निविदांना वाढीव मुदत देण्यास ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाया संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 14. | महापालिका सार्वत्रिक निवडणूक - 2020 प्रक्रिया करण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरीबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :- वरील विषयांबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई विरार शहर महानगरपालिका सार्व.निवडणूक 2020 करीता आवश्यक ती व्यवस्था करणे, निवडणुक कामी आवश्यक साहित्य खरेदी व इत्यादी अनुशंगिक बाबींची व्यवस्था विहित पध्दतीने ई निविदा तसेच आवश्यकतेनुसार कोटेशन मागवुन निवडणुकीचे विविध टप्प्यातील कामे पार पाडण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये 13 कोटी 56 लक्ष पर्यंतच्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.**<br><br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 15. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धुकटन जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुर्न:वापर यंत्रणा बसविणे बाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय / ठराव** :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी रक्कम रु. 5,53,17,440/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यास व पुढील ई-निविदा कार्यवाही करण्यास हि सभा मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 16. | प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड नं. 76 मध्ये वालीव येथील गोलानी नाका - वसई फाटा मुख्य रस्त्यावरील हॉटेल रिजन्सी ते साई पूजा जनरल स्टोअर पर्यंतचा डि पी. रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | **ठराव / निर्णय** :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर कामाच्या रक्कम रु 1,51,49,823/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे हया कामी निविदा दर मागविणेत यावेत असे ही सभा ठरवीते.<br><br>**अनुमोदक :- (कन्हैया भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 17. | प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील 60 फूटी रस्ता (नाना-नानी कट्टा) ते नायगाव स्टेशन पर्यंत विकास आराखडयातील 20 मीटर रस्त्यासाठी आवश्यक जागा भूसंपादन करणे व रस्ता | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विकास आराखडयातील 20 मी. रुंदीच्या रस्त्यात येणारे खाजगी मालकीची जागांचे , शासकिय मालकीची जागांचे बोध होणे कामी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सदर आरक्षण विकसीत करणेसाठी उर्वरीत खाजगी जागा वाटाघाटीद्वारे अथवा भूसंपादनाद्वारे |

| | | |
|---|---|---|
| | विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | ताब्यात घेणे, अंदाजपत्रक तयार करणे, तयार होणाऱ्या अंदाजपत्रकास प्रशासकीय/वित्तीय मान्यता घेणे, तांत्रिक मान्यता मिळविणे, नकाशांना मंजूरी घेणे, निविदा मागविणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 18. | विरार पूर्व येथे रेल्वे हद्द (सूर्यकिरण इमारती जवळ) ते सेंट पिटर शाळेपर्यंत विकास आराखड्यातील 12 मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी आवश्यक जागा भूसंपादन करणे व रस्ता विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर विकास आराखडयातील 12 मी. रुंदीच्या रस्त्यात येणारे खाजगी मालकीची जागांचे, शासकीय मालकीची जागांचे बोध होणे कामी सर्वेक्षणे होणे गरजेचे आहे. सदर आरक्षण विकसीत करणेसाठी उर्वरित खाजगी जागा वाटाघाटीद्वारे अथवा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेणे, अंदाजपत्रक तयार करणे, तयार होणाऱ्या अंदाजपत्रकास प्रशासकीय/वित्तीय मान्यता घेणे, तांत्रिक मान्यता मिळविणे, नकाशांना मंजूरी घेणे, निविदा मागविणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (भरत मकवाना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 19. | वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणी होत असल्याने रूग्णालये, माता बालसंगोपन, केंद्रे दवाखाने, वैद्यकिय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्ती करणेकामी घेतलेल्या निवड प्रक्रियेच्या निकालाकरीता विलंब होत असल्याने कार्यरत वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी वर्गास तात्पुरत्या स्वरूपात 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी 1 दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेची तातडीने अमलबजावणी होत असल्याने रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी आवश्यक असलेले अधिकारी/ कर्मचारी वर्ग नियुक्ती करणेकामी घेतलेल्या निवड प्रक्रियेच्या निकालाकरिता विलंब होत असल्याने कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास तात्पुरत्या स्वरूपात 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी 1 दिवसांचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणेबाबत प्राप्त झालेले पत्र पाहण्यात आलेनुसार सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, सदयस्थितीत कोव्हिड-19 विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेची तातडीने अंमलबजावणी सुरु केलेली असल्याने वैद्यकीय आरोग्य विभागाचा सर्व कर्मचारी वर्ग याकामी कार्यरत आहे. यापूर्वी महानगरपालिकेने माहे फेब्रुवारी 2020 मध्ये घेतलेल्या थेट मुलाखतीचे निकालाचे कामकाज स्थगित करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | उपाय योजनावंर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून सदयस्थित वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास दि.29/05/2020 रोजी सेवा कालावधी संपुष्टात येणार असल्याने दि.29/05/2020 रोजी नंतर 1 दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील 6 महिन्यासाठी कार्यरत सर्व वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कंत्राटी पध्दतीच्या नेमणूका पुढे सुरु ठेवणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई विरारशहर महानगरपालिका